जा.क्र. जिक्रीअमुंश/मराक्रीधो/२००३-०४/का.५/७१०
जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई शहर,
तीसरा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.
ओ. समोर, वालचंद हिराचंद मार्ग,
बोरीबंदर, मुंबई-४००००१
दिनांक :- 13/10/03

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव,
महाराष्ट्र ॲमॅच्युअर बॉक्सींग
संघटना

विषय :- महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण - २००१
राज्यातील एकविध खेळांच्या क्रीडा संघटनांना अधिक गतिमान करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी शासन निर्णय क्र. राक्रीधो/२००२/प्र.क्र.९५/क्रीयुसे-१ दि.१३.८.०३ च्या पत्राची प्रत पाठवित आहोत. त्यानुसार सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. केलेल्या कार्यवाहीचा या कार्यालयास अहवाल सादर करावा ही विनंती.

आपला विश्वासू,

[ एन.बी.मोटे ]
जिल्हा क्रीडा अधिकारी
मुंबई शहर

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

१) मा. संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य पुणे-१

२) मा. उप संचालक, क्रीडा व युवकसेवा,
मुंबई/नाशिक विभाग, मुंबई-१

URGENT

५१३१
५३१/०३
उपसंचालक,
क्रीडा व यु. से. मुंबई विभाग
आवक क्रं
९६३
दि. 22 AUG 2003
प्रत बि. टेबि. मा.

**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण-२००१.**
राज्यातील एकविध खेळांच्या क्रीडा संघटनांना अधिक गतीमान करणे.

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.९५ /क्रीयुसे-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १३ ऑगस्ट, २००२.

**प्रस्तावना :-** विविध खेळांचा प्रचार, प्रसार व विकासासाठी एकविध खेळांच्या राष्ट्रीय संघटना भारतीय ऑलिंपिक महासंघाच्या मान्यतेने देशभर कार्यरत आहेत. त्याच धर्तीवर राज्यात विविध एकविध खेळांच्या संघटना महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या मान्यतेने त्या त्या खेळाचा विकास, प्रचार व प्रसार करीत आहेत. क्रीडा विकास अधिक गतीमान करण्यासाठी विविध एकविध खेळांच्या राज्य संघटनेच्या मान्यतेने कार्यरत असलेल्या जिल्हा संघटना अधिक प्रभावी करुन त्यांचे कार्यक्षेत्र विस्तृत करण्याची नितांत आवश्यकता आहे. जोपर्यंत संघटना, क्रीडा विकासाच्या प्रक्रीयेत समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचत नाहीत, तोपर्यंत सुप्त गुणवत्ता असलेले गुणवान खेळाडू शोधून काढणे शक्य नाही. ही बाब लक्षात घेता एकविध खेळांचया संघटनांच्या कार्यपध्दतीबाबत केंद्र व राज्य सरकारने काही मार्गदर्शक सूचनाही वेळोवेळी दिल्या आहेत. परंतु काही विशिष्ट खेळांच्या संघटना वगळता या सूचनांची अंमलबजावणी हवी त्या प्रमाणात होऊ शकली नाही. क्रीडा विकास ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता क्रीडा विकासाच्या प्रक्रीयेत समाजाचा शेवटचा घटकही सामील करुन घेता येईल, असे प्रयत्न होण्याची आवश्यकता महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २००१ मध्ये विचारात घेतली आहे.

**शासन निर्णय :-** राज्यातील सर्व जिल्ह्यात तळागाळापर्यंत क्रीडा विकास होण्यासाठी एकविध खेळांच्या संघटनांना अधिक गतीमान व प्रभावी करण्याच्या हेतूने सध्या जिल्हा घटक मानून विविध संघटना नियोजन करीत आहेत. आता शासनाच्या नवीन क्रीडा धोरणानुसार क्रीडा विकासाची व्याप्ती व कक्षा वाढविण्यासाठी तालुका हा घटक मानून एकविध खेळांच्या संबंधित जिल्हा/राज्य संघटनेच्या मान्यतेने तालुकास्तरीय संघटना स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

अ.१) प्रत्येक राज्यस्तरीय एकविध खेळ संघटनेस त्या-त्या खेळाच्या ऑलिंपिक महासंघाची मान्यता असलेल्या राष्ट्रीय एकविध खेळ संघटनेची मान्यता असणे आवश्यक आहे.

अ.२) महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या महसुली जिल्ह्यांपैकी किमान ७५ टक्के जिल्हा संघटनांना राज्य संघटनेस संलग्नित असणे आवश्यक आहे.

अ.३) जिल्हा संघटनांना त्या त्या जिल्ह्याच्या महसुली तालुक्यातील ७५ टक्के त्या त्या एकविध खेळाच्या तालुका संघटना संलग्नित असणे आवश्यक आहे.



URGENT

२.१ या शासन निर्णयाखाली समाविष्ट होणाऱ्या सर्व एकविध खेळांच्या राज्य संघटनांनी तसेच त्यांना संलग्नित विविध स्तरावरील संघटनांनी खेळाडूंची, कार्यकर्त्यांची, मार्गदर्शकांची नोंदणी करणे बंधनकारक राहील.

२.२ संघटनांनी स्पर्धा आयोजीत केल्यानंतरच निवड चाचण्या घेणे बंधनकारक राहील. तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर या संघटनांनी त्या त्या खेळांच्या राष्ट्रीय संघटनेच्या धोरणानुसार दरवर्षी स्पर्धा व प्रशिक्षण शिबीर नियमितपणे घेणे आवश्यक आहे. मात्र अशा उपक्रमांच्या आयोजनाच्या वेळी आयोजनाच्या तारखा संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यास कळविण्यात याव्यात.

२.३ या तारखा प्राप्त झाल्यानंतर सदर उपक्रमास स्वतः अथवा आपला प्रतिनिधी पाठवून, उपक्रमाचे निरीक्षण जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी करावे व तसा अहवाल संचालकांकडे सादर करावा. या अहवालाची एक प्रत संबंधित खेळांच्या राज्य संघटनेसही पाठवावी.

२.४ पायाभूत सुविधांच्या अभावी काही राज्य संघटनांना व जिल्हा संघटनांना तालुका संघटना स्थापन करणे शक्य होणार नाही. त्या त्या संघटनांनी यासाठी संचालक, क्रीडा व युवक सेवा यांची परवानगी घ्यावी. संचालक, क्रीडा व युवकसेवा यांनी संबधित जिल्ह्याच्या जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडून त्या विशिष्ट खेळांच्या सुविधांच्या उपलब्धतेबाबत अहवाल प्राप्त करुन त्यास मान्यता द्यावी. उदा.रोईंग, कनोईंग, कयाकिंग, याटींग, शुटींग इ.

२.५ प्रत्येक तालुका, जिल्हा व राज्य संघटनांनी त्यांच्या संघटनांच्या घटना व नियमानुसार स्थापन केलेल्या विविध समित्यांवर महिलांना प्रतिनिधीत्व देणे बंधनकारक राहील.

२.६ तालुका क्रीडा संघटनेस त्या त्या खेळाचे किमान पाच संघ सांघिक क्रीडा प्रकारांसाठी व किमान ५० खेळाडू वैयक्तिक क्रीडा प्रकारासाठी संलग्नित असणे आवश्यक आहे.

३. उपरोक्त अटींचे पालन न करणाऱ्या संघटनांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान वा अन्य सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार नाहीत.

४. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(सु.वं.चव्हाण)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्यातील सर्व एकविध खेळांच्या क्रीडा संघटना (संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांचेमार्फत)
उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर
सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समिती (पत्राने)
सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी/ तालुका क्रीडा अधिकारी
मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
निवड नस्ती (क्रीयसे-१)

URGENT